# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.

E-mail : diplomadesk10dte@gmail.com Internet : www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक

क्रमांक : 10/एनजीपी/उन्हाळी सुट्टी/2014/ ३४८

दिनांक : 10 APR 2014

विषय : उन्हाळी सुट्टी : शैक्षणिक वर्ष 2013-14

संदर्भ : संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचे पत्र दिनांक 21.3.2014

सर्व शासकीय व शासकीय अनुदानित व विनाअनुदान तत्वावर चालणरी तंत्रनिकेतने व इतर पदविका (स्वायत्त तंत्रनिकेतनांव्यतिरिक्त इतर) संस्थांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना प्रत्येक वर्षामध्ये 40 दिवस उन्हाळी सुट्टी व 20 दिवस हिवाळी सुट्टी देण्यात येते.

त्या अनुषंगाने सर्व संस्थाप्रमुखांना कळविण्यात येते की, त्यांच्या संस्थेतील जे कर्मचारी (व्हॅकेशनल स्टाफ) सुट्टीस पात्र आहेत, त्यांना महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने नेमून दिलेल्या सत्राचा कालावधी लक्षात घेवून दिनांक 20.5.2014 ते 28.6.2014 पर्यंत 40 दिवस उन्हाळी सुट्टी देण्यात यावी.

तसेच उपरोक्त कालावधीत परिक्षा, उत्तर पत्रिका मूल्यमापनाच्या कामासाठी आवश्यक तेवढयाच कर्मचाऱ्यांना थोपविण्यात यावे. ते परीक्षेची कामे सुरळीत पार पाडतील व त्यामध्ये कोणत्याच प्रकारचा अडथळा येणार नाही, याची दक्षता घ्यावी. त्यांना पुढे असेही कळविण्यात येते की, संबंधीत कर्मचारी वर्गाकडून परीक्षेच्या कामामध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई किंवा कामचुकारपणा दिसून आल्यास त्यांच्यावर नियमाप्रमाणे शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, हेही संबंधीत कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणावे.

तसेच ज्या संस्थांना शैक्षणिक स्वायत्तता दिलेली आहे, त्या संस्थांमध्ये सत्र अभ्यासक्रम राबविले जातात. तेव्हा त्या संस्थांना त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करण्याच्या कालावधीचा विचार करुन तसेच महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या परीक्षेच्या कामासाठी लागणारा कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन दिला जाईल, या अटीवर त्यांच्या सोईनुसार उन्हाळी सुट्टी देण्यास परवानगी देण्यात येत आहे. तथापी, सदर सुट्टी 40 दिवसांपेक्षा जास्त असू नये.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण, म.रा.,मुंबई.

प्रत : प्राचार्य, शासकीय, शासकीय अनुदानित व विनाअनुदानित तत्वावर चालणारी तंत्रनिकेतने व इतर तत्सम पदविका संस्था (संबंधीत सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये यांचेमार्फत)

प्रत माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित :

1. संचालक, महाराष्ट्र राज्य, तंत्रशिक्षण मंडळ, 49, खेरवाडी, अलीयावर जंग मार्ग, बांद्रा (पू.), मुंबई-51.
2. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/ औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/ नाशिक/ पुणे.
3. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालये, औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/ पुणे.
4. कार्यासन क्रमांक 2, 2अ, 4, 4अ, 7 व 12 मुख्य कार्यालय, मुंबई.

---

सहसंचालक तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय, नागपूर.

क्र :—तंशिस/प्राकाना/पदविका/उन्हाळी सुट्टी/२०१४/ १३८७

दि. - 3 MAY 2014

प्रति,
प्राचार्य,
शासकीय, शासकीय अनुदानित व विना अनुदानित तत्वावर
चालणारी तंत्रनिकेतने व इतर तत्सम पदविका संस्था.
नागपूर विभाग.

उपरोक्त परिपत्रका प्रमाणे उन्हाळी सुट्टीबाबत कार्यवाही करावी.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय,
नागपूर